# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## कर आकारणी विभाग

| | |
|---|---|
| **आदेश स्वरुप** | बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक सन्मान योजना (माजी सैनिक व सैनिक विधवा/पत्नी यांना मालमत्ता करातून सूट देणेबाबत) |
| **आदेश क्रमांक** | क्र. ८७ दि.१७/०५/२०२१ |
| **अंमलबजावणी कालावधी** | धोरण अंमलात असे पर्यंत. |
| **कोणाच्या माहितीसाठी** | सर्व विभागीय अधिकारी/भाग निरिक्षक/भाग लिपीक/वित्त व लेखा तसेच लेखापरिक्षण विभाग/ जनसंपर्क विभाग/माहिती व तंत्रज्ञान विभाग/देखभाल दुरुस्ती करीता नियुक्त एजन्सी |
| **संदर्भ** | १) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण –२०१६/ प्र.क्र.५९/ नवि-२०, मंत्रालय मुंबई, दि. ०५ एप्रिल २०१६<br>२) महाराष्ट्र शासन शुध्दीपत्रक, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण -२०१६/ प्र.क्र.५९/ नवि-२०, मंत्रालय मुंबई, दि.०७ एप्रिल २०१६<br>३) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण -२०१६/ प्र.क्र.५९/नवि-२०,मंत्रालय मुंबई, दि.०९ जानेवारी २०१७<br>४) महापालिका ठराव क्र. २६८ दि. २०/०७/२०१७.<br>५) आदेश क्र. जा.क्र./म.का/मुनिकस/कक्ष-१/६३/२०१७ दि. २१/०८/२०१७<br>६) महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णयक्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१०१/भाग-२/का.२८, मंत्रालय मुंबई दि. २३ नोव्हेंबर २०२०.<br>७) महापालिका ठराव क्र. ६२७ दिनांक ०९/०४/२०२१ |

शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २०१६/प्र.क्र.५९/नवि-२० मंत्रालय दिनांक ५ एप्रिल २०१६ अन्वये संरक्षण दलातील शौर्य पदक धारक व माजी सैनिकांच्या विधवांना मालमत्ता करातून सूट देण्याबाबत शासन निर्णय पारित झाला होता. सदर शासन निर्णय “नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात राहणाऱ्या, देशासाठी प्राणाची बाजी लावून जीवाची पर्वा न करता निःस्वार्थीपणे देशाचे संरक्षण करतांना बजाविण्यात आलेल्या उत्कृष्ट कामगिरिकरीता संरक्षण दलातील शौर्य पदक धारकांना आणि माजी सैनिकांच्या विधवांना त्यांच्या नावावर असलेल्या एका मालमत्तेच्या मालमत्ता करातून सूट देण्याचा निर्णय मा. महाराष्ट्र शासनाने घेण्यात आलेला आहे.” सदरच्या शासन निर्णयास, मा. महापालिका ठराव क्र. २६८ दिनांक २०/७/२०१७ अन्वये मान्यतेनुसार, संदर्भ क्र. ५ च्या आदेशानुसार अंमलबजावणी दि. १ एप्रिल, २०१७ पासुन करणेत येत आहे.

तद्नंतर महाराष्ट्र शासनाने, बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक सन्मान योजना संदर्भ क्र. ६ अन्वये लागु केली असुन, सदर शासन निर्णयामध्ये यापुर्वीचे ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र, व्हीपीएम-२०२०/प्र.क्र.९३/पंरा-४, दि. १८/०८/२०२० व नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.५९/नवि-२०, दि. ०९/०९/२०२० अन्वये निर्गमित केलेले आदेश अधिक्रमित करुन, संदर्भ क्र. ६ चा सुधारीत शासन निर्णय पारित केला आसुन, सदरचा शासन निर्णय नाशिक महापालिकेच्या सभा पटलावर माहितीस्तव सादर करण्यात आला होता, त्यास महापालिका ठराव क्र. ६२७ दि. ०९/०४/२०२१ अन्वये शासन निर्णयातील नमुद अटी-शर्ती व मनपाच्या अटी-शर्तीनुसार माजी सैनिक व सैनिक विधवा/पत्नी याचे मालकी हक्कातील एकाच निवासी मिळकतींवर, मालमत्ता करात सन २०२१-२०२२ पासुन सुट देणे बाबत मान्यता दिलेली आहे. त्यानुसार संदर्भ क्र. ६ व ७ नुसार, यापुर्वी संदर्भ क्र. ५ अन्वये पारित झालेला आदेश अधिक्रमित करणेत येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२८-अ नुसार मालमत्ता करा मध्ये पाणीपट्टी, पाणीपट्टी लाभ कर, मलनिस्सारण कर, मल निस्सारण लाभ कर, सर्वसाधारण कर, शिक्षण उपकर, पथकर व सुधार आकार यांचा समावेश होतो. त्याव्यतिरिक्त मालमत्ता कराच्या देयकामध्ये महाराष्ट्र शासनाचे, महाराष्ट्र शिक्षण उपकर अधिनियम १९६२ नुसार सरकारी शिक्षण कर व रोजगार हमी कर तसेच महाराष्ट्र टॅक्स ऑन बिल्डींग अधिनियम १९७९ नुसार निवासी कर, आग निवारण कर व वृक्षसंवर्धन इ. कर आकारणेत येतात, सदर करांवर सुट अनुज्ञेय नाही.

त्याअनुषंगाने माजी सैनिक याचा अर्थ हा माजी सैनिक (केंद्रीय नागरी सेवा व पदांवर पुर्ननियुक्ती) सुधारणा नियम, २०१२ मध्ये विहीत केल्याप्रमाणे राहील.

माजी सैनिक व सैनिक विधवा/पत्नी यांचे नावे, नाशिक महानगरपालिका हद्दीतील असलेल्या एका निवासी मालमत्तां करीता सन २०२१-२०२२ पासून मालमत्ता करामध्ये (शासकीय कर तसेच आग निवारण व वृक्षसंवर्धन कर इ. वगळता) खालील अटी-शर्तीनुसार (पुर्ण १००%) सवलत/सूट देण्यात येत आहे.

१. सदर योजना लाभ मिळण्यासाठी माजी सैनिक महाराष्ट्र राज्यात जन्मलेला असावा किंवा महाराष्ट्र राज्याचा किमान १५ वर्षे सलग रहिवासी असावा. त्याकरीता त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडुन अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२. मालमत्ता कराच्या, करमाफीस पात्र ठरणाऱ्या व्यक्तीने नाशिक जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्याकडून प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३. सवलत/ सुट मिळणेस, पात्र व्यक्ती नाशिक महानगरपालिका हद्दतील स्व: मालकीच्या फक्त एका रहात्या निवासी मालमत्ते करीता करमाफीस पात्र राहील. तसे घोषणापत्र त्यांनी संबंधित जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक राहील.

४. या योजनेचे लाभ संबंधित माजी सैनिक व त्यांच्या पत्नी/विधवा तसेच अविवाहीत शहीद सैनिकांच्या बाबतीत त्यांचे आईवडील हयात असेपर्यंत हे लाभ देय राहतील.

५. बिगरनिवासी वापरातील मिळकतींना सदरची सवलत अनुज्ञेय नाही.

६. सदर योजनेचा लाभ मान्यता दिल्यानंतर पात्र व्यक्तींनी दर तिन वर्षांनी, पुढील सवलत मिळणेकामी उक्त नमुद केल्याप्रमाणे मुद्दा क्र. १ व २ ची पुर्तता करुन नाशिक महानगरपालिकेकडे विहीत नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.

७. मालमत्ता करामध्ये, सवलत/सुट दिलेल्या पात्र व्यक्ती व्यतिरिक्त, मिळकतीच्या वापरात अथवा भाडेतत्तवावर वापर आढळुन आल्यास, अशा मिळकतीस सवलतीचा लाभ अनुज्ञेय नाही.

८. ज्या आर्थिक वर्षापासुन योजनेचा लाभ प्राप्त होणार आहे, त्या आर्थिक वर्षातील मागील थकबाकी रक्कम पुर्णपणे भरणा करणे अनिवार्य आहे.

तरी वरिल नमुद अटी-शर्तीनुसार योजनेचा लाभ मिळणेस पात्र व्यक्तीने, संबंधीत विभागाकडे अर्ज सादर केल्यानंतर, संबंधीत विभागाच्या भाग निरिक्षक यांनी लाभ प्राप्त मिळकतीची प्रत्यक्ष पहाणी व स्थळपंचनामा, इ. अहवाल, तयार करुन प्रकरण विभागीय अधिकारी यांचेमार्फत विभाग प्रमुख्यांकडे मुदतीत सादर करणेत यावेत.

सदर योजनेचा लाभ देणेबाबत उपआयुक्त (कर) यांना अधिकार प्रदान करणेत येत आहे.

आयुक्त १५/०५/२०२१

नाशिक महानगरपालिका, नाशिक